आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी द्विपक्षीय चर्चा /उभय देशांमधे ३ सामंजस्य करार
- मणिपूरमधे, बिरेन सिंग सरकारला दिलेला पाठिंबा तात्काळ काढून घेण्याचा नॅशनल पिपल्स पार्टीचा निर्णय
- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात, विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या ठीकठिकाणी सभा
- इफ्फी, चित्रपट महोत्सवाच्या आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाचे अध्यक्ष म्हणून दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती

**आणि**

- महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत विजयी घोडदौड कायम ठेवत भारताची जपानवर ३-० अशी मात

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी आज द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमधल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा त्यांनी घेतला. संरक्षण, उर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात नायजेरियाबरोबरच्या भागीदारीला भारताच्या दृष्टीने महत्त्व असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. या चर्चेनंतर सांस्कृतिक देवाणघेवाण, सीमाशुल्क सहकार्य आणि सर्वेक्षण सहकार्य संबंधातल्या ३ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.  नायजेरियातला सर्वोच्च सन्मान ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना जाहीर झाला असून त्याकरता मोदी

यांनी तिनुबू यांचे आभार मानले. हा केवळ व्यक्तिशः आपला सन्मानच नव्हे तर सर्व भारतीयांचा सन्मान असून भारत – नायजेरिया यांच्यातल्या दृढ संबंधांचं प्रतीक असल्याची भावना प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. नायजेरियातल्या पूरसंकटात भारत २० टन मदत साहित्य पाठवत असल्याचं त्यांनी सांगितलं. ब्रिक्स देशांच्या संघटनेचं सदस्यत्व नायजेरियाला मिळाल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केलं.

चर्चेपूर्वी प्रधानमंत्री मोदी यांचं अबुजामधल्या अध्यक्षांच्या निवासस्थानी पारंपरिक पद्धतीने स्वागत झालं. अबुजा विमानतळावर काल ते उतरले तेव्हा नायजेरियातला भारतीय समुदाय मोठ्या संख्येनं त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होता. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल, नायजेरियातल्या मराठी भाषक समुदायानं मोदी यांचे आभार मानले.

नायजेरियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री दोन दिवसांच्या ब्राझिल दौऱ्यावर रवाना होणार आहेत. या दौऱ्यात ते रियो द जानिरोमधे आयोजित जी ट्वेंटी राष्ट्रप्रमुखांच्या शिखर परिषदेला उपस्थित राहतील. तसंच त्या निमित्ताने रियो मधे जमलेल्या इतर देशांच्या नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा करतील.

ब्राझिलनंतर प्रधानमंत्री मोदी येत्या १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान गयानाला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

मणिपूरमधे, नॅशनल पिपल्स पार्टीनं एन बिरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. नॅशनल पिपल्स पार्टीचे अध्यक्ष कॉनराड संगमा यांनी भाजपा अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांना पत्राद्वारे हा निर्णय कळवला आहे. राज्यातली सध्याची कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक असून गेल्या काही दिवसात ती आणखीच चिघळत चालली आहे. त्यात अनेक निष्पाप

नागरिकांना जीव गमवावा लागला आहे, असं संगमा यांच्या पत्रात म्हटलं आहे. हा प्रश्न सोडवण्यात आणि राज्यातली स्थिती पूर्ववत करण्यात बिरेनसिंग यांच्या नेतृत्वाखालचं सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं आहे, त्यामुळे आपल्या पक्षानं या सरकारला दिलेला पाठिंबा तात्काळ काढून घ्यायचा निर्णय घेतलाय, असंही या पत्रात म्हटलं आहे.

मणिपूर विधानसभेत नॅशनल पिपल्स पार्टीचे सात आमदार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार संपायला आता, आज आणि उद्या असे दोनच दिवस शिल्लक राहीले आहेत. आज रविवार असल्यानं विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आज ठिकठिकाणी सभा घेतल्या.

**<><><><><>**

महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आले, यामुळे राज्यातली दहा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक बाहेर गेली, अशी टीका काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी केली आहे. त्या आज गडचिरोली जिल्ह्यात देसाईगंज इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होत्या. त्या म्हणाल्या…

**होल्ड - बाईट - प्रियंका गांधी**

केंद्र सरकार महत्त्वाची बंदरं, विमानतळ आणि अन्य सरकारी कंपन्या उद्योगपतींच्या घशात घालत असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात अडीच लाख रिक्त पदं असून बेरोजगारी प्रचंड वाढली आहे, युवक आत्महत्या करत आहेत, त्यांच्यासाठी काही करण्याऐवजी सरकारनं उद्योगपतींचं १६ लाख कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं. हे धोरण चुकीचं आहे, असं त्या म्हणाल्या.

काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.

प्रियंका गांधी यांनी आज नागपुरात रोड शो केला. त्याला नागरिकांची प्रचंड गर्दी दिसून आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

महायुतीचं सरकार आल्यानंतरच राज्य प्रगतीच्या मार्गावर पुढे गेलं असून, यापुढंही आपण ते पुढंच नेऊ, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धुळ्यात साक्री इथं झालेल्या प्रचारसभेत दिलं. नंदुरबार जिल्ह्यात धडगाव इथंही त्यांनी आज प्रचारसभा घेतली. आचार संहिता संपल्यानंतर मोलगी तालुक्याची निर्मिती करण्याचं आश्वासन शिंदे यांनी या सभेत दिलं.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात मिरजगाव इथं आज भाजपाचे नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उमेदवार राम शिंदे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. काँग्रेसने संविधानाच्या धज्जिया उडवण्याचं काम केल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर इथं वार्ताहर परिषद घेतली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय होईल, असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी यावेळी व्यक्त केला. महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा आज मुंबईत होत आहे. या सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित आहेत.

<><><><><>

झारखंडमधे विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार उद्या संध्याकाळी संपणार असल्यानं विविध राजकीय पक्षाचे नेते जोरदार प्रचार करत आहेत. भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी आज गोमीया, सिंद्री आणि नाला इथं प्रचारसभा घेतल्या. झारखंडमधलं हेमंत सोरेन सरकार भ्रष्टाचारी असून, सोरेन बांगलादेशी घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. हेमंत सोरेन यांनी आज गिरीदिह, जामा आणि जामतारा इथं सभा घेतल्या. भाजपा आपल्याला लक्ष्य करत असून, महत्त्वाच्या मुद्यांवरुन जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे, अशी टीका त्यांनी केली. सोरेन सरकार भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप भाजपाचे निवडणूक सहप्रभारी हिमंत बिस्वा सर्मा यांनी महागमा इथल्या सभेत केला. काँग्रेस, राजद, एजेएसयू आणि डाव्या पक्षांनीही आज झारखंडच्या विविध भागांमधे सभा घेतल्या, तसंच रोड शो केले.

<><><><><>

इफ्फी म्हणजेच भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ साठी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा महोत्सव २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात आला आहे.

<><><><><>

महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत आज भारताने आज जपानवर ३-० अशी मात करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. बिहारमध्ये राजगीर इथं हा सामना झाला. भारताच्या नवनीत कौर आणि दीपिका कुमारी यांनी आपल्या खेळाची कमाल दाखवत हा विजय मिळवून दिला. आता या

स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मंगळवारी पुन्हा भारताच्या संघाची लढत जपानशी होणार आहे.

**<><><><><>**

थोर स्वातंत्र्य सेनानी लाला लजपत राय यांच्या ९६ व्या पुण्यतिथीदिनी देशानं आज त्यांना आदरांजली वाहिली. यानिमित्त, पंजाबमधल्या मोगा जिल्ह्यातल्या लालाजींच्या मूळ गावी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता..

**<><><><><>**

शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या विकासात अग्रणी भूमिका निभावली असून मराठी माणसाला सक्षम बनवलं, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.